


समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 235 | सोमवार दि. 08 सप्टेंबर 2025 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## जातीवाद संपवून समाजात समतेची नवी सुरुवात व्हावी : धनंजय मुंडे

**» दीपक थोरातांच्या सामाजिक कार्याचे आ. धनंजय मुंडेंकडून कौतुक**







बीड/प्रतिनिधी "हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा आहे. मात्र अलीकडच्या काळात महापुरुषांना जातिवादाच्या चष्म्यातून पाहिले जात आहे. ही प्रवृत्ती समाजातील बंधुभावाला धक्का देणारी आहे. जातीजातीत महापुरुष वाटून घेतले जाणे ही अतिशय चिंताजनक बाब आहे. त्यामुळे ही परिस्थिती आपण सर्वांनी मिळून नाहीशी करून समाजात पुन्हा एकदा खरी समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे शनिवार (दि.6) रोजी महाराष्ट्र आधार सेना, दैनिक महाराष्ट्र आरंभ आणि सत्यशोधक प्रतिष्ठान यांच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सत्यशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी धनंजय मुंडे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

मुंडे पुढे म्हणाले की, "साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पान 3 वर

## फडणवीसांचा हैदराबाद गॅझेटवर मोठा खुलासा!


**'ज्याची नोंद त्यालाच जात प्रमाणपत्र, सरसकट नाहीच...'**



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते. यामध्ये हैदराबाद गॅजेटचा निर्णय सर्वात मोठा मानला जातो. मात्र या निर्णयानंतर याचा मराठा समाजाला किती फायदा होणार आणि ओबीसी समाजाला किती फटका बसणार यावरती चर्चा रंगल्या आहेत. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच याबाबत स्पष्टता दिली आहे.पुरंदरमध्ये आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या 234व्या जयंतीचा शासकीय सोहळा देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली. याप्रसंगी ते बोलत होते. फडणवीस म्हणाले, आमच्या सरकारची नीती पक्की आहे. एकाच काढून दुसऱ्याला द्यायचं नाही. तसेच दोन समाजाला लढवायच देखील नाही. देशात कधी काळी बाहेरून आलेल्या व्यवस्थेनं आपल्या समाजातील वेगवेगळ्या घटकांना विभाजित ठेवून राज्य केलं. आपल्याला तसं न करता सगळ्यांना सोबत घेऊन पान 3 वर

## आज ठळक

### राज्यात गणपती विसर्जन मिरवणुकीला गालबोट, वेगवेगळ्या घटनेत 18 जणांचा मृत्यू



लाडक्या बाप्पााला निरोप देण्यात आला, राज्यभरात मोठ्या उत्साहात विसर्जन मिरवणुका पार पडल्या, मात्र काही ठिकाणी गणपती विसर्जनासाठी आलेल्या भाविकांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटना देखील घडल्या आहेत. नाशिकमध्ये गणेश विसर्जनावेळी तिघांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, तर धुळ्यात गणपती विसर्जन करून परतणाऱ्या तरुणाचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दुसरीकडे मीरा भाईंदरमध्ये देखील विसर्जन मिरवणुकीवेळी मोठी दुर्घटना घडली आहे. विजेच्या तारांना स्पर्श होऊन तरुणाचा जागीच मृत्यू आहे, तर अन्य एक तरुण थोडक्यात बचावला. नांदेड, मुंबईमध्ये देखील अशाच काही घटना घडल्या आहेत.नाशिक जिल्ह्यात गणेश विसर्जनावेळी वेगवेगळ्या घटनेत तिघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. पहिल्या घटनेत आनंदवल्ली येथे गोदावरी नदीच्या प्रवाहात दोघे वाहून गेले होते.मात्र एक जण पोहून बाहेर आल्याने बचावला. तर दुसरा तरुण प्रवीण शांताराम चव्हाण या तरुणाचा मृत्यू झाला आहे. दुसऱ्या घटनेत बोरगड येथील चंदर नथू माळेकर (वय 29) रा. म्हसोबावाडी,यांचा बुडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, तिसऱ्या घटनेत सिन्नर शहराजवळ असणाऱ्या सरदवाडी धरणात गणपती विसर्जनासाठी गेलेल्या ओमप्रकाश सुंदरलाल लिल्हारे वय 40 यांचा बुडून मृत्यू झाला.

गणपतीचं विसर्जन करून परतणाऱ्या तरुणाचा अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पान 3 वर

## महामोर्चा काढणार, दोन पातळ्यांवर लढाई लढणार; ओबीसी आरक्षणाच्या बचावासाठी अखेर काँग्रेस मैदानात



मागील काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी वादावरून राज्यातील राजकारण तापलं आहे. राजकीय पक्षांकडून दोन्ही समाजाला खुश ठेवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. अशातच आता ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या बचावासाठी काँग्रेस थेट रस्त्यावर उतरणार असल्याचं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं आहे.राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयामुळे मूळ ओबीसी समाजावर अन्याय होत असल्यामुळे ऑक्टोबरमध्ये नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार अशल्याचं वडेट्टीवार यांनी सांगितलं आहे. नागपुरात शनिवारी विदर्भातील जवळपास सर्व जिल्ह्यातील ओबीसी संघटनांची बैठक पार पडली. यानंतर आरक्षणाच्या मुद्द्यावर पान 3 वर

## मनोज जरांगेंच्या नवीन मागणीने ओबीसींना धडकी, आता थेट हायकोर्टात दाद मागणार, त्या GR विरुद्ध थोपाटले शड्डू



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील 29 ऑगस्ट रोजी मुंबईत धडकले. उपोषणाच्या पाचव्या दिवशी त्यांच्या लढ्याला मोठे यश मिळाले. सरकारने सातारा आणि हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा GR लागू केला. त्यांच्या इतर मागण्यांबाबत विचार करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी वाढवून घेतला. कुणबी नोंद असलेल्या मराठ्यांना ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला. पण त्याचवेळी आज माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळांना मोठा इशारा दिला.आता मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र दौरा नाही.आम्ही आता खुश झालो आहोत. आम्ही आरक्षण मिळवले.GR निघाला म्हणजे लहान गोष्ट नाही, अशी प्रतिक्रिया जरांगे पाटील यांनी दिली. महाराष्ट्रातील गरीब मराठा बांधवांनी त्यांनी आवाहन केले की कोणीही हार, पुष्पगुष्य,शाल असे आणून खर्च करु नका. आपण हार तुरे आणि शाल घेऊ नये,आपला जो वायफळ खर्च होतोय त्यातून गरिबांना मदत करू. मला घरातील कुंकू आणून लावले तरी चालेल, असा साधेपणा त्यांनी दाखवलाकुणी बॅनर लावा,कुणी कॅम्पेन करा,आम्ही तुमचे आभार आणि कौतुक करू. मात्र तातडीने प्रमाणपत्र द्या, असे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. तुम्ही कामे केल्यास आम्ही तुम्हाला मोठेपणा देऊ. शिंदे समितीस बढती दिल्यास सर्व विभागात नोंदी शोधण्याचे काम सुरुच ठेवा. सरकारने कामे केल्यास आम्ही कौतुकच पान 3 वर

## शिवशक्ती गणेश मंडळाचे समाज उपयोगी कार्य कौतुकास्पद -राजेश गित्ते



परळी (वार्ताहर)- शिवशक्ती गणेश मंडळ बेलंबा तालुका परळी वैजनाथ आयोजित *विविध स्पर्धाबक्षीस वितरण समारंभ भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांच्या हस्ते करण्यात आला.

या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक जगमित्र संपादक बालासाहेब कडबाने,ह भ प सचिन महाराज गित्ते, कैलास मंत्री सर, बेलेश्वर ऑटो युनियन अध्यक्ष माधवराव गित्ते,राजेभाऊ गित्ते, गोविंद गित्ते, भाऊसाहेब गित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.शिवशक्ती गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी यांनी सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार केला.या कार्यक्रमात गावातील शेतकऱ्यांच्या मुलीच्या लग्नासाठी 10,000 चा धनादेश राजेश गित्ते यांच्या हस्ते पान 3 वर

## एस.टी. आरक्षणासाठी बंजारा समाजाची आज जिल्हास्तरीय बैठक बीडमध्ये

**समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- शरदभाऊ राठोड**



बीड (प्रतिनिधी) – महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एस.टी. प्रवर्गात सामाविष्ट करण्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या लढ्याला चालना देण्यासाठी समस्त बंजारा समाज, बीड जिल्हा यांच्या वतीने जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक आज सोमवार दि. 8 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता सौभाग्य लॉन्स, पांगरी रोड, बीड येथे होणार असून समस्त बंजारा बांधवांनी मोठ्या संख्येने या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन अ.भा. बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय महासचिव शरदभाऊ राठोड यांनी केले आहे.

हैद्राबाद मॅझेटीअरच्या प्रमाणावर समाजाचा एस.टी. प्रवर्गात समावेश व्हावा, यासाठी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. आता या आंदोलनाची दिशा व आगामी धोरण ठरवण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

समाजातील सर्व थोर नेते, कार्यकर्ते, महिला पान 3 वर

## परळी शहरात गणेशोत्सव उत्साहात साजरा

## बाप्पाला ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात भावपूर्ण निरोप

















परळी वैजनाथ शहरात या वर्षीचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात इतिहासात पहिल्यांदाच डिजेमुक्त पारंपरिक वाद्यांच्या गजरात साजरा झाला. सार्वजनिक गणेश मंडळांनी विविध देखावे, सामाजिक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. शहरात सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी, अर्थात गणेश विसर्जनाच्या दिवशी, बाप्पाला ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात भावपूर्ण निरोप देण्यात आला.

शहरात सकाळपासूनच गणेश विसर्जन मिरवणुकीची तयारी सुरु झाली होती. पारंपरिक वेशभूषेतील तरुण-तरुणी, महिला आणि लहान मुलांनी या मिरवणुकीत सहभाग घेतला होता. यंदा विसर्जन मिरवणूक पोलीस प्रशासनामुळे इतिहासात पहिल्यांदाच डिजेमुक्त पारपडली. शहरातील मुख्य रस्त्यांवरुन ही मिरवणूक काढण्यात आली, जिथे प्रत्येक मंडळाचा देखावा आणि त्यांची कलात्मकता पाहायला मिळत होती. नव किरण गणेश मंडळांच्या वतीने तयार करण्यात आलेला छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर औरंगजेबाने केलेले अत्याचाराच्या जिवंत देखाव्याने गणेश भक्त भावूक झाले. तसेच कवी कलश यांचाही देखावा सादर करण्यात आला. लोकमान्य गणेश मंडळांने पान 3 वर

संपादकीय

# कार्यकर्त्यांना सांभाळा – अन्यथा..!

राजकारणात प्रत्येक पक्षाचा पाया म्हणजे त्याचे कार्यकर्ते. निवडून आलेले, निवडणुकीत पराभूत झालेले आणि नव्या पिढीचे कार्यकर्ते – हे तिघेही गट पक्षाची निष्ठा, क्षमता आणि भवितव्य ठरवतात. मात्र, अनेक वेळा वरिष्ठ नेते याचे भान ठेवत नाहीत. वरवर पाहून "काम झाले आहे" अशी समजूत ठेवल्यास हे पक्षासाठी घातक ठरते.

राष्ट्रपतीपासून ते ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत एक राजकीय चैन अस्तित्वात असते. खासदारांनी आमदारांना, आमदारांनी सरपंचांना पाठबळ द्यावे. ही चैन फक्त सत्ताधारी प्रतिनिधीपुरती मर्यादित नसून, निवडणुकीत पराभूत झालेले अनुभवसंपन्न नेते, माजी पदाधिकारी आणि नव्या कार्यकर्त्यांनाही संधी व मान-सन्मान दिला पाहिजे. जर वरिष्ठ नेते या चैनची योग्य काळजी घेत नाहीत, तर खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांची निष्ठा कमी होते, पक्षाची कार्यक्षमता मंदावते आणि राजकीय वातावरणात तणाव निर्माण होतो.

विशेषतः निवडणुकीत पराभूत झालेले नेते हे अनुभवसंपन्न असून कार्यकर्त्यांमध्ये अजूनही त्यांचा प्रभाव मोठा असतो. त्यांना उपेक्षित केल्यास ते पक्षापासून दूर होतात किंवा निष्क्रीय राहतात. अनेकदा हे नेते त्यांचे ज्ञान, अनुभव आणि कौशल्य नव्या पिढीच्या कार्यकर्त्यांसोबत वाटून देऊ शकले नाहीत. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये भ्रम निर्माण होतो की, "माझी मेहनत आणि अनुभव याला कुणी महत्त्व देत नाही," आणि परिणामस्वरूप त्यांची निष्ठा ढासळते.

नव्या पिढीचे कार्यकर्ते हे पक्षाचे भविष्य आहेत. हे युवा कार्यकर्ते उत्साही असतात, नवीन कल्पना आणतात आणि प्रचारात तसेच विकासकामांमध्ये मेहनत करतात. परंतु, जर त्यांना योग्य मार्गदर्शन, संधी आणि मान-सन्मान दिला गेला नाही, तर ते दुसऱ्या पक्षाकडे आकर्षित होऊ शकतात किंवा निष्क्रिय होतात. त्यामुळे वरिष्ठ नेते, खासदार, आमदार आणि सरपंच यांची जबाबदारी फक्त स्वतःच्या पदावर टिकून राहणे नाही; त्यांनी पुढच्या पिढीचे कार्यकर्ते प्रशिक्षित करणे, त्यांना प्रोत्साहित करणे आणि पक्षाशी बांधणे आवश्यक आहे.

राजकीय चैन टिकवण्यासाठी प्रत्येक स्तरावर सुसंगत पाठबळाची आवश्यकता असते. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांना, पंतप्रधानांनी मुख्यमंत्रींना, मुख्यमंत्र्यांनी खासदारांना पाठबळ द्यावे; खासदारांनी आमदारांना, आमदारांनी जिल्हा परिषद अध्यक्षांना पाठबळ द्यावे; जिल्हा परिषद अध्यक्षांनी पंचायत समिती सभापतींना पाठबळ द्यावे; पंचायत समिती सभापतींनी सरपंचांना, सरपंचांनी ग्रामपंचायत सदस्यांना पाठबळ द्यावे; तसेच नगरपरिषद/महानगरपालिका महापौरांनी नगरसेवकांना पाठबळ द्यावे. ही पाठबळ फक्त आर्थिक किंवा प्रशासनिक मदतीपुरती मर्यादित नसून, मार्गदर्शन, सल्ला, प्रोत्साहन, मान-सन्मान आणि कामाच्या संधी या सर्व अंगांनी दिले जाणे आवश्यक आहे. प्रत्येक पातळीवर वरिष्ठ नेते खालच्या पातळीवरच्या नेत्यांशी सतत संवाद साधत राहावेत, त्यांचे अनुभव व अडचणी समजून घेतले जावेत आणि त्यांना निर्णय प्रक्रियेत समावेश दिला जावा. यामुळे पक्षाची कार्यक्षमता टिकते आणि कार्यकर्त्यांमध्ये निष्ठा, विश्वास व प्रेरणा कायम राहते.

कार्यकर्त्यांना सांभाळण्यात फक्त नैतिक जबाबदारी नाही, तर हे राजकीय यशाचे अत्यावश्यक साधन आहे. जेव्हा कार्यकर्त्यांना त्यांच्या मेहनतीचे मूल्य समजते, त्यांना विश्वास मिळतो आणि काम करण्याची प्रेरणा वाढते, तेव्हा प्रचार, विकासकामे आणि धोरणे योग्य रीतीने राबवता येतात. अनेकदा निरीक्षण केले जाते की काही नेते इतके विसराळूपणाने वागतात की त्यांच्या अपूर्णतेमुळे पक्षाच्या प्रतिमेला धक्का बसतो, प्रचार आणि विकासकामे मंदावतात आणि स्थानिक तसेच राज्यस्तरीय निवडणुकांमध्ये परिणाम दिसतो. वरिष्ठ नेत्यांनी प्रत्येक स्तरावर सहभाग, मार्गदर्शन आणि पाठबळ दिले पाहिजे; फक्त पदावर बसून पक्ष चालत नाही.

शेवटी, काही नेते फक्त स्वतःच्या यशावर लक्ष केंद्रित करतात. ते कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्य समजू शकत नाहीत, त्यांना त्यांच्या अनुभवाचा योग्य सन्मान नाही. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह कमी होतो. जर कार्यकर्त्यांना सांभाळले नाही, तर यापुढे कोणीही कोणाशी निष्ठा ठेवणार नाही. ही हकीकत सर्व पक्षांसाठी लागू होते. वरिष्ठ नेते, माजी नेते आणि नव्या कार्यकर्त्यांमध्ये संतुलन राखल्याशिवाय पक्ष टिकत नाही, विकासकामे राबत नाहीत आणि निवडणुकीत यश मिळवणे कठीण होते. त्यामुळे प्रत्येक स्तरावर, वरच्या पातळीपासून खालपर्यंत, मान-सन्मान, मार्गदर्शन आणि संधी देणे अत्यावश्यक आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास हरवल्यास, पक्षाची नींव ढासळते आणि राजकीय यश दूर होते

# दर्शनाचं पियुष आणि मॅचिंग थीम

डॉ. दशरथ भोसले

मानवी जीवनात कामाचा ताण, जबाबदाऱ्या आणि दगदग भरपूर असते. पण या सर्वांमध्ये जर थोडं हसणं, चेष्टा, खोड्या आणि हलकाफुलका विनोद मिसळला तर रोजच्या आयुष्याला एक वेगळाच रंग चढतो. कार्यालयीन जीवनातही अशी मजेशीर प्रसंगांची मालिकाच निर्माण होते. कधी सहकाऱ्यांच्या चेष्टा, कधी अचानक घडणाऱ्या खोड्या तर कधी एखाद्या निरागस गैरसमजातून उडालेला हशा – या सगळ्यातून कामाचा थकवा नाहीसा होतो आणि एकमेकांत आपुलकी निर्माण होते. प्रस्तुत कथा अशाच एका कार्यालयीन वातावरणातील विनोदी प्रसंगाची आहे.

कथा: आमच्या कार्यालयाची नवीन प्रशासकीय इमारत झाल्याने कार्यालयाचे कामकाज तिथे सुरु झाले. प्रशस्त हवेशीर खोल्या, कँटीनची सुविधा, सुसज्ज मीटिंग हॉल आणि बहुतांश खोल्या ए.सी. होत्या. एका बाजूला जेन्ट्स टॉयलेट, त्याला लागून मोठी खोली – पंचवीस खुर्च्या, टेबल, स्टील कपाटे, पावसाळ्यात भिजलेले कपडे बदलण्यासाठी सोय अशा सगळ्या सोयी उपलब्ध होत्या. कपाटात सुके कपडे ठेवता येत. कोणाला सिगारेट ओढण्याची तलफ आली किंवा कोणाला इप्को पेस्ट लावायची लहर आली तरी त्याचीही सोय होती. पण याचा अर्थ असा नव्हता की नियमित कामकाजात कोणीही कामचुकारपणा करत असे. पुरुष कर्मचारी टिफिन खाण्यासाठी बहुतेक वेळा कँटीनमध्ये जात असत.

महिला कर्मचारी वर्गासाठीही अशीच स्वतंत्र व्यवस्था होती. पावसाळ्यात ओले कपडे बदलण्याची सोय होती. मात्र महिला कर्मचारी कॉमन रुममध्येच टिफिन खात असत. त्यांचे हसणे, खिदळणे संपूर्ण ऑफिसमध्ये ऐकायला येत असे. एकदा असेच हसणे बराच वेळ सुरु होते. एका पुरुष जासूसाने महिला केबिनमधले रहस्य शोधून काढले. मग ऑफिसभर हास्याची लाट पसरली.

झालं असं की, कार्यालयातील रश्मी साने हिचं पस्तीशी उलटल्यावर जयवंत पाटणकर याच्याशी एक वर्षापूर्वी लग्न झाले. नव्या नवरीचं नवेपण संपायच्या आधीच तिच्या पतीला शिक्षणासाठी परदेशात कंपनीमार्फत एक वर्षासाठी जावे लागले. एकदा प्रेमवेडी रश्मीने पतीला फोन केला. "माय डियर जयू, कसा आहेस? तुला भेटण्यासाठी जीव कासावीस होतोय. कधी हा दुरावा संपतोय असं झालंय. मधु इथे आणि चंद्र तिथे अशी आपली अवस्था आहे."

पतीच्या आठवणीने व्याकुळ झालेली रश्मी पुढे म्हणाली – "जयू, तुझा एक फोटो पाठव ना. तू नाश्ता करत असशील तर तो फोटो पाठव. जेवत असशील तर जेवताना फोटो पाठव. गार्डनमध्ये असशील तर गार्डनचा फोटो पाठव. ड्रिंक घेत असशील तरी फोटो पाठव."

काकुळतीने रश्मी फोनवर बोलत होती. पतीही मिश्कील आणि खोडकर स्वभावाचा. तो म्हणाला – "माय डियर स्वीटहार्ट, मी फोटो पाठवला असता गं! पण मी आहे आता टॉयलेटमध्ये!" हे ऐकताच सगळ्यांची हसून पुरेवाट झाली. मैत्रिणी रश्मीला रोज चिडवत, "काय गं, आजतरी मिस्टरांचा फोटो आला की अजूनही टॉयलेटमध्येच अडकलेत?" बिचारी रश्मी लाजेनं चूर होऊन जायची.

महिला वर्गात दर्शना खोत पुढारी होती. तिने एकदा कल्पना मांडली – "आपण सगळ्या रोज संध्याकाळी चार वाजता लेडीज रुममध्ये जमू, चहाबरोबर प्रत्येकजणीने एकेक दिवशी काही तरी खाऊ आणूया." कल्पना सगळ्यांना आवडली. मग कोणी चितळेची बाकरवडी आणली, कोणी पुण्याचा लक्ष्मी नारायण चिवडा, कोणी पाणीपुरी, कोणी चकल्या, कोणी भडंग... दररोज मस्तमस्त खायला मिळत होतं.

आता दर्शनाचा नंबर आला. ती म्हणाली – "तुमच्यापेक्षा माझा मेन्यू वेगळा असेल. हेल्थला पोषक आणि पचायला हलका असेल." सगळ्यांची उत्सुकता वाढली. लाजत-मुरकत दर्शनाने पदार्थाचे नाव सांगितले – "पियुष."

दुसऱ्या दिवशी दर्शनाने कपाटातून स्टीलची किटली काढली आणि सर्वांच्या ग्लासात पियुष ओतायला सुरुवात केली. पण तो काही दुसरा नव्हे तर मसाला ताकच निघालं! अपेक्षा भंगातही विनोद असतो म्हणतात, तसंच झालं. ऑफिसभर "पियुष" नावाचा हा मसाला ताक प्रसिद्ध झाला.

यानंतर दर्शनाने आणखी एक कल्पना मांडली – "आपण पुढील आठवडाभर मॅचिंग करून यायचं." महिला मंडळींनी होकार दिला. ही बातमी शैलेश या आमच्या जासूसापर्यंत पोचली. त्याच्या डोक्यातही भन्नाट आयडिया आली. लंच ब्रेकमध्ये त्याने पुरुषांसाठी मॅचिंगची कल्पना मांडली.

"येत्या रविवारी सगळ्यांनी पत्नीबरोबर हॉटेल पद्मा येथे यायचं. पण अट एकच – पत्नीचा ड्रेस नवऱ्याच्या केसांच्या रंगाशी मॅचिंग असावा. सुरेशचे केस काळे – तर बायकोनं काळा ड्रेस. राजाभाऊंचे केस पांढरे – बायकोनं पांढरा ड्रेस. शब्बीरचे केस मेहंदीमुळे लाल – भाभीचा लाल ड्रेस. प्रमोदचे केस पिंगट – तर तसाच ड्रेस. शामला अर्धटक्कल – तर त्याची बायकोनं स्लीव्हलेस ड्रेस. आता किशोरचा नंबर आला. किशोर टकल्या! केसच नाहीत. तर बायकोनं काय घालायचं?..." कल्पना करून सगळे जोरात हसू लागले. किशोरचा ईगो दुखावला. तो शैलेशला मारायला धावला, पण मित्रांनी अडवलं म्हणून शैलेश वाचला.

महिलांची मॅचिंग थिम मात्र जोरात सुरु झाली. रोज एक रंग – लाल, निळा, पिवळा... पायातील स्लिपर, घड्याळाचा पट्टा, साडी, ब्लाऊज, कपाळावरील टिकली, केसातली फुलं, बांगड्या, झुमके – सगळं मॅचिंग. माझ्या पत्नीची मैत्रीण स्वप्नाली सुपेकर हिचा तर हातखंडाच होता. मी पत्नीला म्हणालो – "तुझी मैत्रीण स्वप्नाली एकदम मस्त दिसते, ऑफिसात भाव खाऊन जाते."

एकदा पिवळ्या रंगाची थिम होती. स्वप्नाली माझ्या टेबलाजवळ आली आणि म्हणाली – "जिजू, मी कशी दिसते?" मला चेष्टा करण्याची लहर आली – "स्वप्नाली, आज तू रूपसुंदरी दिसतेस. पिवळ्या रंगामुळे तुझे सौंदर्य उजळून निघालंय. पायातील चप्पल पिवळी, साडी पिवळी, ब्लाऊज पिवळा, बांगड्या पिवळ्या, टिकली मॅचिंग, डोक्यातली फुलं मॅचिंग... एवढंच काय, तुझे दातसुद्धा पिवळे दिसतायत!"

स्वप्नाली आत्मस्तुतीने बहरली होती, पण माझ्या बोलण्याने नाकाचा शेंडा रागाने फुलवत तिने "नालायका!" म्हणून टेबलावरचा पेपरवेट आपटला आणि तोऱ्यात निघून गेली.

ऑफिस सुटल्यावर घरी आलो तर स्वप्नाली आधीच माझ्या घरी पोचली होती. तिने माझ्या पत्नीचे कान भरले होते. मी खाली बसताच पत्नी माझी खरडपट्टी काढायला लागली. माझ्या अपमानाचा बदला घेतल्याच्या खुशीत स्वप्नाली होती. पत्नीने मला हुकूम सोडला – "माझ्या मैत्रिणीची माफी माग."

नाईलाजाने मी स्वप्नालीकडे जाऊन "सॉरी" म्हणालो. ती म्हणाली – "डोन्ट बी सिरियस, टेक इट ईझी." बोलताना नकळत माझा हात तिच्या खांद्यावर गेला. पत्नीचा जोरदार फटका बसल्यावरच मला भान आलं.


पिवळ्या दातांच्या मॅचिंगची केलेली चेष्टा अशी अंगलट आली. एवढंच नव्हे तर कार्यालयातील समस्त महिलांनी माझ्याशी अबोला धरला.

तात्पर्य:

प्रत्येक नात्यात थोडं हसू, थोडं चिडवणं, थोडा अपमान आणि त्यातून उमलणारा गोड अबोला हे सगळं असायलंच हवं. कार्यालय असो किंवा घर, हलक्या फुलक्या विनोदाने नात्यांना गोडवा येतो आणि ताणतणाव दूर होतो. पण कधी चेष्टा अति झाली तर ती अंगलटही येऊ शकते. म्हणूनच – हसत खेळत राहा, पण मापातच!

**डॉ. दशरथ भोसले**
**विनोदी कथा लेखक,**
**दापोली – जिल्हा रत्नागिरी.**

# घाटनांदुर येथे विजेचा शॉर्टसर्किट होऊन गॅसच्या सिलिंडर चा स्फोट दोन दुकानदाराचे लाखोचे नुकसान



घाटनांदुर प्रतिनिधी: — अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळ असलेले सोमेश्वर ॲग्रो एजन्सी व सोमेश्वर हॉटेल या दोन दुकानाला 5 सप्टेंबर शुक्रवार रोजी संध्याकाळी 10 च्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागली त्या नंतर सोमेश्वर हॉटेल मधील दोन ते तीन गॅस सिलेंडरचा स्फोट झाला या स्फोटात कोणतीहीजीवित हानी झाली नाही मोठी आग लागल्याने स्थानिक नागरिकांनी अग्निशमन दलाला याची माहिती दिली अग्निशमन दलाला माहिती मिळताच अंबाजोगाईचे व परळी चे अग्निशमन दल काही मिनिटात घाटनांदुर येथे पोहोचल्याने आग आटोक्यात आली तसेच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रशासनास माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झाले आगीच्या परिसरातील गर्दी हटवून मदत कार्य केले या दोन्ही दुकानदाराचे 21 लाख रुपयाचे नुकसान झाल्याचे सोमेश्वर ॲग्रो एजन्सी चे मालक आनंद डिडवाणी व सोमेश्वर हॉटेलचे मालक प्रशांत आरसुडे यांनी केले आहे

# मनी - ध्यानी नसताना मंत्री पंकजाताईनी एकनिष्ठेला दिले फळ - श्री अशोकजी करे यांना केले भाजपाचे बीड जिल्हा सचिव - गावकऱ्यांणी केले जल्लोशात स्वागत



धारूर ( बाबुराव तिडके )मा श्री अशोकजी करे यांना भाजपाने बीड जिल्हा कमेटीवर सचिव पदी नियुक्ती केली असल्याने मंत्री पंकजाताईनी त्यांना एकनिष्ठेचे फळच दिले आहे धारूर तालुक्यातील सुरनरवाडी हे गाव डोंगदाच्या दरीत असलेले गाव या गावामध्ये मोबाईल नेटवर्क नाही व श्री अशोक करे गावापासुन शेतात दुर राहातात आपली जिल्ह्याच्या कमेटीवर सचिव म्हणुन निवड होईल असे त्यांना कधीच वाटले नाही त्यांच्याकडे कोणतेही वाहन नाही भाजपा जिल्हा सचिव म्हणून निवड झाली त्यावेळी ते त्यांच्या शेतात होते त्यांना कोणतीच कल्पना नव्हती पण कर्मात असले की ते नशिबाने मिळतेच काही कामा निमित्त ते सायंकारी त्या दिवशी गावाच्या बाहेर रेंजमध्ये आले असता आपल्या मोबाईलवर एवढ्या शुभेच्छा व मॅसेच कश्याचे ते पाहात असतानाच एका नेत्याचा फोन खणखणला व आपली भाजपा बीड जिल्हा सचिव पदी निवड झाली असता आपले अभिनंदन म्हणताच श्री अशोक करे यांच्या आनंदाला पारावार उरला नाही लोकनेते स्व मुंडे साहेबांचे मिश्कीन भक्त श्री अशोक करे आहेत ते वीस वर्षे सुरणरवाडी या गावचे सरपंच होते व त्यांनी या गावचा विकास केला परत भाजपाचे लोकप्रिय धारूर तालुका अध्यक्ष म्हणून त्यांनी पक्षाला शोभेल असे काम केले व सर्वसामाण्यात मिसळून राहाणारे मा श्री अशोक करे म्हणुन त्यांची ख्याती आहे या आपल्या गावच्या सुपुत्राला भाजपा जिल्हा कमेटीवर काम करण्याची संधी मिळून गावाचे नाव मोठे झाले म्हणुन मा श्री अशोकजी करे यांचा सुरणरवाडी या गावाने मोठ्या जल्लोशात सत्कार केला असता या कार्यक्रमाला लहान - थोर वयोवृद्ध व महिलांची संख्या मोठी होती ..

# अभिनव विद्यालयातील लाडक्या गणरायाला निरोप



परळी -ज्ञान प्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव विद्यालय नेहरु चौक परळी येथे संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ जब्दे व संस्थेचे सचिव परळी भूषण साहेबराव फड यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशाची स्थापना करण्यात आली होती आज अनंत चतुर्थीच्या दिवशी गणरायाची आरती व पूजा बालगणेश भक्त अभिनव सूर्यकांत कातकडे व सर्व शिक्षकवृंद यांच्या हस्ते करून लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

# वडवणी तालुक्यातील अनाधिकृत वृक्षतोडीच्या विरोधात निवेदन दाखल



वडवणी तालुक्यामध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत वृक्षतोड चालू आहे. ही एक अतिशय गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.

सविस्तर वृत्त असे आहे की, बीड जिल्ह्या सह वडवणी तालुक्यामध्ये वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत असून

या अनधिकृत कृतीमुळे आपल्या तालुक्याच्या नैसर्गिक संपत्तीवर, जमिनीच्या सुपीकतेवर, पावसाच्या प्रमाणावर आणि संपूर्ण पर्यावरणावर गंभीर दुष्परिणाम होत आहेत. वन्यजीवांचे अधिवास नष्ट होणे, हवेच्या गुणवत्तेत घट होणे आणि पूरासारख्या नैसर्गिक आपत्तीचा धोका वाढणे हे काही प्रमुख परिणाम आहेत.

ही अनधिकृत वृक्षतोड थांबवण्यासाठी आणि या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यासाठी, वडवणी पोलीस स्टेशनच्या ए पी आय वर्षाताई व्हगाडे मॅडम यांच्याकडे एक तपशीलवार निवेदन दाखल करण्यात आले आहे. यावेळी दिलीप शेंडगे, बंधू सेवानिवृत्त जवान कैलास भाऊ शेंडगे यांच्यासह अनेक उपस्थित होते.या निवेदनात वृक्षतोडीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला आहे.

आम्ही सर्वच या जनहिताच्या बाबतीत एकत्र येऊन आवाज उठवणे आवश्यक आहे. आपले सहकार्य आणि पाठिंबा यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे.

ही माहिती शक्य तितक्या लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.जेणेकरुन वृक्षतोडीला आळा बसेल आणि पुन्हा नंदनवन व्हायला वेळ लागणार नाही. जाग मानवा जाग.

# समाजसेवक सुरेश पाटलांनी मनोज दादांच्या तब्येतीची केली विचारपूस



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे यासाठी हैदराबाद आणि सातारा गॅजेट लागू करावे यासाठी मुंबईच्या आजाद मैदानावर पाच दिवस उपोषण केल्यामुळे तब्येत खालवल्याने छत्रपती संभाजी नगर येथील गॅलेक्सी सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल मध्ये ॲडमिट असलेले मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांनी भेट घेऊन तब्येतीचे विचारपूस केली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी मराठा योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांना आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी अशी विनंती केली. तसेच आपण मराठा समाजासाठी लढता, आपली मराठा समाजाला गरज असून मराठा समाजाला सरसकट आरक्षणासाठी हैदराबाद गॅजेटचा जीआर काढून घेतल्याबद्दल दादांचे विशेष अभिनंदन केले. कारण हैदराबाद गॅजेट मध्ये जातनिहाय जनगणनेच्या कॉलम मध्ये मराठा जात ऐवजी कुणबी जात होती. तर मग मराठा आणि कुणबी एकच आहे हे गॅजेटनुसार सिद्ध झालेलं आहे. मराठा समाजाची पन्नास वर्षाची लढाई आता आपण जिंकलेली आहे याचा फायदा सर्व मराठा बांधवांना होणार असल्याने मनोज दादांचे तोंड भरून कौतुक केले.

# राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा - सचिन राठोड गोर सेना प्रसिद्धी प्रमुख



वडवणी प्रतिनिधी

हैद्राबाद गॅझेट लागु करून मराठवाड्यातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा सचीन राठोड यांनी दिला आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सचीन राठोड यांनी असे म्हटले आहे की, 1918 साली हैद्राबाद संस्थान अस्तित्वात असताना मराठवाडा आणि अन्य भाग हा हैद्राबाद संस्थानामध्ये समाविष्ट होता.

हैद्राबाद संस्थानातील बंजारा समाज हा अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट आहे, तेलंगणा आणि कर्नाटक राज्यातील बंजारा समाज हा एस टी प्रवर्गात आहे आणि महाराष्ट्रात VJNT मध्ये अशा प्रकारचा भेदभाव केला गेला आहे.

तेलगंना, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश मधील बंजारा समाजाची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व भौगोलिक वाईट परिस्थिती जशी आहे तशीच परिस्थिती महाराष्ट्रातील बंजारा समाजाची किंबहुना त्या पेक्षा हलाखीची परिस्थिती आहे.

देशातील बंजारा समाजाची एकच बोलीभाषा, एकच पेहराव आणि एकच संस्कृती असताना सुद्धा वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळं आरक्षण दिले गेले आहे त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजावर सरळ सरळ अन्याय आहे.

हैद्राबाद गॅझेट मध्ये बंजारा समाजाच्या सामाजिक मागासलेपणाचा,बोली भाषा, संस्कृती आणि भौगोलिक बाबींचा उल्लेख केला गेला आहे त्यामुळे राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट तात्काळ लागू करुन मराठवाड्यातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी बंजारा व्यापक आंदोलन छेडणार आहे असे सचीन राठोड यांनी म्हटले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

जयंतीनिमित्ताने होणारा हा सोहळा परिवर्तन घडवणारा आहे. अण्णाभाऊंना भारतरत्न मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. समाजाच्या इतरही मागण्यांसाठी आपण नेहमीच ठामपणे लढा देणार आहोत. घरकुल, गायरान यांसारख्या जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी लोकप्रतिनिधी म्हणून आवाज उठविण्यात आपण कधीही मागे हटणार नाही."गेल्या 17 वर्षांपासून समाजासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याचे काम दीपक थोरात यांनी केले. त्याबद्दल मुंडे म्हणाले की, "सत्यशोधक पुरस्कार हा कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा आहे. ज्यांना हा सन्मान मिळतो त्यांना नव्या उर्जेचा संचार होतो. दीपक थोरात यांनी एक शिस्तप्रिय कार्यकर्ता म्हणून सुरुवात करून आज यशस्वी संपादक म्हणून लौकिक मिळवला आहे. त्यांच्या अथक परिश्रमांतून आणि संघर्षातून प्रेरणा घेण्यासारखे आहे. सामान्य कुटुंबातून पुढे येऊन त्यांनी गाठलेले यश हे खऱ्या अर्थाने समाजासाठी आदर्श आहे. त्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत."या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार विजेत्यांचा सत्कार करताना सभागृहात उत्साहाचे वातावरण होते. समाजाच्या प्रश्नांवर आणि समतेच्या मूल्यांवर भर देणारे मुंडे यांचे विचार उपस्थितांवर ठसा उमटवणारे ठरले.यावेळी स्वर्गीय एकनाथ आवाड यांनी उभा केलेला पात्र लाभार्थींच्या गायरानचा लढा मी हाती घेणार असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले. यावेळी मी माझी मातृ तुल्य गयाबाई आवाड यांचा सत्कार करण्याचे भाग्य मला मिळाले यावेळी मी भारावून गेलो, असेही मुंडे म्हणाले. यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील महामेरु लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर, उत्कृष्ट उपसंपादक उत्तम हजारे, दैनिक पुण्यभूमीचे सुनील डोंगरे, प्रजापत्राचे बाबुराव झेंडे, उत्कृष्ट फोटोग्राफर कृष्णा शिंदे, ज्ञानेश्वर वायबसे सह शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य असणाऱ्या सीमा ओस्तवाल, सिने वनवा नावाचा चित्रपट अभिनेत्री श्रुती सह अभिनेता पत्रकार बाळासाहेब आडागळे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के, उत्कृष्ट रक्तदान शिबिर बबलू शिंदे तुषार लोंढे उत्कृष्ट अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती बाबासाहेब कांबळे दिंद्रुड व रामतीर्थ येथील मसूर पवार यांनी उत्कृष्ट जयंती काढल्याबद्दल त्यांचाही या ठिकाणी सन्मान करण्यात आला यावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच महाराष्ट्र आधार सेना संस्थापक अध्यक्ष, सायं. महाराष्ट्र आरंभाचे संपादक दीपक थोरात, उद्धव आरे अशोक वाघमारे सह सर्व पदाधिकारी उपस्थित होते

-------------------------------------------

राज्य करायचा आहे. त्यामुळे याचं काढून त्याला देण्याची नीती आमची नाही.त्यामुळे मराठा समाजाचा विचार करताना ओबीसी समाजाचा अहित होणार नाही. याला आम्ही प्राधान्य दिलं आणि त्या पद्धतीचाच निर्णय आम्ही केला. मराठवाड्यामध्ये 1948 पर्यंत निजामाचं शासन होतं. त्यामुळे महाराष्ट्रातील इतर सर्व भागांमध्ये इंग्रजांचा रेकॉर्ड असून मराठवाड्यात तशा नोंदी सापडतं नाहीत. त्यामुळेच कास्ट सर्टिफिकेट काढायचा असल्यास त्या नोंदी फक्त हैदराबाद गॅझेटमध्येच सापडतात. याचा विचार करूनच हैदराबाद गॅजेट चालतील अशा पद्धतीचा निर्णय सरकराने घेतला आहे. त्यामुळे ज्या ज्याची नोंद यात आहे त्यालाच सर्टिफिकेट मिळेल, सरसकट मिळणार नाही असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.मराठा समाजाची नोंद असलेला तो व्यक्ती वंचित राहणार नाही. त्याला त्याचा फायदा होणार आहे. मात्र ओबीसी समाजाच्या ताटातलं काढून घेण्याचं काम आम्ही केलेलं नाही. त्यामुळे या निर्णयाने मराठा समाजाचं हित झाला आहे. मात्र ओबीसी समाजाचा कुठेही अहित झालेलं नाही आणि ओबीसी समाजाला आम्ही विश्वास देतो की जोपर्यंत हे सरकार आहे. तोपर्यंत ओबीसींच अहित होऊ दिल जाणार नाही.ओबीसीचे मंत्रालय असून महाज्योतीही आहेत आणि आता ओबीसीसाठी महामंडळही सक्षम करणार हेच सरकार आहे. कारण आम्हाला माहिती आहे छत्रपती शिवाजी महाराजांसोबत लढणाऱ्या अठरापगड जातींना आम्ही एकत्र करून त्यांचा विकास साधत नाही तोपर्यंत शिवकार्य पूर्ण होणार नाही. ओबीसींचा विकास आणि उद्धार हे शिवकार्य असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

-----------------------------

बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, उरलेल्या 19 टक्क्यांतही मराठा समाजाला आरक्षण दिल्यास ओबीसींना किती उरणार? असा सवाल करत कुणी कुठल्याही पक्षाचा असला तरी आपल्यासाठी झटणाऱ्याला साथ द्या, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.दरम्यान, नागपुरात येत्या 12 सप्टेंबरला प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक होणार असून पहिली लढाई न्यायालयीन स्तरावर लढली जाईल. विदर्भातून वकील संघटना पूर्ण ताकदीने न्यायालयात ओबीसींची बाजू मांडणार आहेत. तर दुसरा लढा आंदोलनाच्या माध्यमातून केला जाईल, कुणावरही अन्याय होऊ नये ही आमची भूमिका असली तरी ओबीसींच्या आरक्षणाला देखील धक्का लागू नये ही पण आमची भूमिका असल्याचं वडेट्टीवार म्हणाले.

-------------------------------------------

करू. आमच्या मागण्या पूर्ण करा. अन्यथा पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचा इशाराही त्यांनी दिला. एकनाथ शिंदे हे मोकळा धाकळा माणूस आहे,ते तसे करणार नाहीत.GR ओके आहे. GR कसा ही काढला तरी नंतर दुरुस्ती करावी लागते. गैरसमज पसरवून कुणाचे ऐकू नका. केसलेही येतात आणि बरळतात, त्यांनी नुकसान केली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कुणीही आरक्षणापासून वंचित राहणार नाही. मालोजीराजेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना तुम्हाला आरक्षण घ्यायचे असेल तर घ्या नाही तर राहू द्या असे जरांगे पाटील म्हणाले..

-------------------------------------------

देण्यात आलाकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पधादिकारी यांनी परिश्रम घेतले. समाजउपयोगी कार्यक्रम आयोजित केल्या बद्दल सर्व शिवशक्ती गणेश मंडळ पदाधिकारी यांचे राजेश गित्ते यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास गावकरी मंडळी आणि सर्व स्पर्धक मोठया संख्येने उपस्थित होते.

-------------------------------------------

व युवकांनी मोठ्या संख्येने या बैठकीस हजेरी लावून समाजाची ताकद दाखवावी, असे आवाहन शरदभाऊ राठोड यांनी केले आहे. ते म्हणाले की," बंजारा जागा हो, एस.टी. आरक्षणाचा धागा हो...समाजाच्या हक्कासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.दरम्यान, या बैठकीतून पुढील आंदोलनाचा कार्यक्रम निश्चित केला जाणार असून, जिल्ह्यातील सर्व बंजारा बांधवांनी एकदिलाने सहभागी होण्याचे आवाहन शरदभाऊ राठोड यांनी केले आहे.

-------------------------------------------

धुळे जिल्ह्यात घडली आहे.शिरपूर तालुक्यातील तापी नदीमध्ये गणपतीचं विसर्जन करून हा तरुण दुचाकीवरुन परत होता, याचदरम्यान हा अपघात झाला, शुभम सांगवी असं या तरुणाचं नाव आहे.गणपती विसर्जन मिरवणुकीच्या वेळी मीरा भाईंदरमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. विजेच्या तारांना स्पर्श झाल्यानं एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे, तर एक तरुण थोडक्यात बचावला. मीरा भाईंदरप्रमाणेच मुंबईच्या साकीनाका परिसरात गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत विजेचा धक्का लागून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर या घटनेत पाच जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.नांदेड जिल्ह्यातही गणेश विसर्जनादरम्यान अशीच दुर्दैवी घटना घडली आहे, गाडेगाव शिवारातील आसना नदीत गणपती विसर्जनासाठी उतरलेले तिघे जण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. यापैकी एकाला वाचवण्यात यश आले. मात्र अजूनही दोन जण बेपत्ता आहेत. तर शहापूर तालुक्यात तीन जणांचा आणि अमरावतीमध्ये वेगवेगळ्या घटनेत तिघांचा मृत्यू झाला आहे.

-----------------------------

शहरातील सरस्वती नदीची स्वच्छता यासंदर्भात देखावा सादर करत नदी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. अनेक ठिकाणी सामाजिक संदेश देणारे देखावे लक्षवेधी ठरले. ढोल-ताशांचा निनाद आणि संबळ, हलगीच्या तालावर गणेशभक्त मोठ्या उत्साहात नाचत होते. मिरवणुकीतील प्रत्येक मंडळाने आपापल्या पद्धतीने बाप्पाला निरोप दिला. शहरातील प्रमुख चौक असलेल्या राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकातून ही मिरवणूक जात असताना, रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून नागरिक, महिला, चिमुकले मिरवणुकीचा आनंद घेत होते. यावर्षीच्या मिरवणुकीत गुलाल ऐवजी कागदी हवेच्या मशीन द्वारे झिरमाळ्या व फुलांची उधळण केली.विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन आणि मंडळांच्या कार्यकर्त्यांनी विशेष काळजी घेतली होती.

## पान 4 वरुन

अनेक दशक उभी असलेली झाड तोडली आहेत. त्यामुळे पर्यावरण प्रेमींमधून संताप व्यक्त केला जात असून दोषी अधिकाऱ्यावर कारवाई केली जावी अशी मागणी होत आहे.

-------------------------------------------

स्वयंसेवक एकाच वेषात मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रयत्न करीत होते. सर्वांना मंडळाचे ओळखपत्र, शेला, टोपी असा पारंपरिक ड्रेस होता. पोलीसाच्या डिजे मुक्त अभियानाला पाळून मंडळाने ही मिरवणूक पारंपरिक पद्धतीने साजरी केली.

-------------------------------------------

ताकद दाखवली, ओबीसी बांधव एकजूट होत आहेत. हाके पुढे म्हणाले, गेवराईचा आमदार मुरकुल्या आहे (विजयसिंह पंडित यांना टोला). कारण त्याने एका टिव्ही चॅनेलवर मला कुत्रा म्हणाला. आपल्यात खंडोबाचा वाघ्या असतो, असे म्हणून हाकेंनी गेवराई मतदारसंघाचे आमदार यांना सुनावले आहे.

-------------------------------------------

ही घटना शनिवार दि. 6 सप्टेंबर रोजी रात्री 5 वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. सदरील या घटनेने वडवणी तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. आत्महत्या का केली ? कशामुळे केली? याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. वडवणी पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा करून मृतदेह बीड जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास वडवणी पोलीस करत आहेत. गेल्या पंधरा दिवसात वडवणी तालुक्यातील दोन अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याने अधिकारी वर्गात खळबळ उडाली आहे.

-------------------------------------------

परंतु हबीब पुरा मध्ये एकही घरकुल नाही

निवडणूक आली की मात्र नेतेमंडळी "आमचा वार्ड, आमची वस्ती" म्हणत मत मागतात, पण निवडणूक संपल्यानंतर हबीबपुरा वस्तीच्या विकासाकडे कोणी लक्ष देत नाही, अशी नागरिकांची खंत आहे.स्थानिकांनी ची प्रशासनाला मागणी आहे की, वस्तीला स्पष्ट ग्रामीण की शहरी असा दर्जा द्यावा आणि पाणी, रस्ते, गटार तसेच शासकीय योजनांचा लाभ तात्काळ उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी समाजिक कार्यकर्ता जमीर शेख यांनी हबीब पुराचे नागरिकांचे मूलभूत सुविधांसाठी पत्रकार प्रसिद्धीच्या माध्यमातून केली आहे.

-------------------------------------------

हृदय सम्राट आदरणीय सुजाता दादा आंबेडकर यांचा आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका यांच्या होऊ घातलेल्या निवडणुक पूर्वीचा झंजावात सुरु झाला असून याचाच एक भाग म्हणून परळी शहरात वंचितची एल्गार सभाच नव्हे तर वंचितांच्या हक्काचा आणि स्वाभिमानाचा रणघोष असून माननीय सुजात दादा आंबेडकर यांची सभा ठरवेल उद्याचा बदल त्यामुळे ही सभा आयोजित करण्यात आली असून या सभेच्या पूर्वनियोजित तयारीसाठी काल परळी शहर तालुक्यातील अनेक पदाधिकारी हीतचिंतक व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी प्रामुख्याने भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष एच. टी. वाघमारे. समता सैनिक दलाचे प्रमुख डॉक्टर स्वप्निल महाळंगीकर यशपाल बचाटे डॉक्टर सिद्धार्थ जगतकर यांच्यासह वंचित बहुजन आघाडी वंचित बहुजन युवा आघाडी यासह विविध शाखांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी एल्गार सभेच्या तयारीसाठी याच बैठकीत 70 हजार रुपये जमा झाले असून पुढील होणाऱ्या सभेसाठी सर्व कार्यकर्ते हितचिंतक व पदाधिकारी यांनी तन मन धन लावून काम करावे असेही आव्हान वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गौतम साळवे वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुका अध्यक्ष राजेश सरवदे वंचित बहुजन युवा आघाडीचे महासचिव ज्ञानेश्वर गीते उपाध्यक्ष अवि मुंडे वंचित बहुजन आघाडीचे शहर उपाध्यक्ष संदीप ताटे नंदकुमार सावंत जयपाल जगतकर वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी शहराध्यक्ष प्रेम जगतकर सिद्धूधन आचार्य आदर्श जंगले यांच्यासह जिल्हा पदाधिकारी तालुका पदाधिकारी शहर पदाधिकारी इत्यादीने केले असून या बैठकीस अनिल अवचार अजय वावळे संदीप गायकवाड वैभव मस्के प्रेम मस्के राष्ट्रपाल केदारे राहुल बचाटे विकास पवार विकास चोपडे विजय झिंजुर्डे धम्मपाल किरवले विजय झिंजुर्डे केशव कांबळे अभिनव मस्के संदेश आदोडे संतोष वावळे समाधान कांबळे ब्रह्मानंद साळवे प्रभाकर गावडे प्रमोद रोडे उत्तम रोडे नवनाथ रोडे बालासाहेब बनसोडे सुभाष रोडे बाळासाहेब किरवले यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते

-------------------------------------------

परंपरा आणि उत्साह या तिन्हींचा सुंदर संगम या मिरवणुकांमधून दिसून आला.

गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांमध्ये नशामुक्तीबाबत जनजागृती घडवून आणण्यासाठी पोलिस अधीक्षक साहेबांनी सोशल मीडिया, वृत्तपत्रे आणि विविध माध्यमांतून आवाहन केले होते. परळीतील मिरवणुकांमध्ये त्याचा प्रभाव दिसून आला. कोणत्याही प्रकारच्या नशेविना, शुद्ध भक्तिभावाने व आनंदात गणेशभक्त वाजंत्रींच्या तालावर नाचत-गात होते.गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान परळी शहर पोलिस स्टेशन व संभाजीनगर पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवून संपूर्ण वातावरण सुरक्षित ठेवले. मिरवणुकीत सहभागी प्रत्येक गणेश मंडळ, ढोल पथक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग उल्लेखनीय ठरला.या यशस्वी आयोजनाबद्दल परळी शहर पोलिस स्टेशन व संभाजीनगर पोलिस स्टेशनच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे नागरिकांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार राजेश्वर आप्पा केदारी, हिंद नगर परळी वै यांनी सांगितले की,"यंदाचा गणेशोत्सव डीजेमुक्त पार पडल्यानं ध्वनीप्रदूषण रोखलं गेलं, पारंपरिक वाद्यांना संजीवनी मिळाली आणि महिलांच्या सहभागामुळे सांस्कृतिक रंगतही वाढली. अशा प्रकारे शिस्तबद्ध व परंपरेनं होणारे उत्सव हेच खऱ्या अर्थानं समाजाला दिशा देणारे आहेत."

-------------------------------------------

प्रेरणादायी ठरणार आहे. याशिवाय ह.भ.प. श्री. प्रभाकर नाना झोलकर यांचे कीर्तन होणार भाविकांना अध्यात्मिक उर्जा मिळणार आहे.सोमवारी दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन असून, सायंकाळी गावातील श्री हनुमान मंदिर परिसरात भक्तिरसाचा महासागर ओसंडून वाहणार आहे. कार्यक्रमानंतर दुपारी 2ते5 या वेळेत भागवत कथा होणार आहे.या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन समस्त गावकरी मंडळ, संगम यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, भाविकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यकार्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.स्व. अक्षय मुंडे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी गावकरी, नातेवाईक व सर्व भाविक भक्तांनी हजेरी लावून पुण्यस्मरण सोहळ्याला आत्मिक बळ द्यावे, अशी भावना ग्रामस्थांनी व दत्तात्रय पंढरीनाथ मुंडे, ज्ञानोबा पंढरीनाथ मुंडे, तुकाराम पंढरीनाथ मुंडे, व अर्जुन पंढरीनाथ मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

-------------------------------------------

नविन थोड्याच दिवसात जाहिर करण्यात येईल असे देखील शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे.

-------------------------------------------

मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रकाशनाचा कार्यक्रम थाटात संपन्न झाला. प्रास्ताविक प्रा. डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी केले. 'एक होता ढम्या' ही कथा पुस्तके शाळकरी मुलांना आनंद व उत्साह देणारी व संस्काराची बिजे पेरणारी आहे असे ते यावेळी म्हणाले. सौ.अरुणा भोयटे यांनी बोलतांना श्री वाकडे यांचा लेखन प्रवास मांडून प्रतिकुल परिस्थितीत लेखणाचा छंद त्यांनी जोपासला आहे, ही आम्हा कुटुंबियांसाठी अभिमानाची बाब आहे असेही त्या म्हणाल्या. प्रमोद गादेकर यांनी श्री वाकडे यांच्या कथांची पुस्तिके मुलांसाठी वाचनीय आहेत, मोठ्यांनीही वाचावीत अशी छोट्यांची ही पुस्तके मुलांवर संस्कार घडविणारी आहेत, शाळकरी मुलांनी ही पुस्तके आवर्जून वाचावीत असे आवाहन त्यांनी यावेळी केले. वसंत राठोड यांनी पुस्तक प्रकाशनास शुभेच्छा दिल्या. सौ.आर.पी.गादेकर यांनी बोलताना 'एक होता ढम्या' या कथा पुस्तिका सुंदर असून मुलांसाठीच्या संस्कार पुस्तिका आहेत. बालकुमारांची कथा लेखणाची लोप पावत चाललेली कला लक्ष्मण वाकडे यांनी जोपासली असल्याचे सौ.गादेकर म्हणाल्या. सौ.स्नेहा पवळे यांनी यावेळी बोलताना आमच्या पप्पांचा लिहिण्याचा छंद आदर्श घेण्याजोगा आहे. आपली साहित्यकृती निर्माण करण्यासाठी ते खूप परिश्रम घेतात. त्यांची पुस्तके वाचकप्रिय आहेत, त्यांचा हा वसा आम्ही जोपासण्याचा प्रयत्न करु असेही त्या म्हणाल्या. श्री लक्ष्मण वाकडे यांनी 'एक होता ढम्या' व आपला लेखन प्रवास यावेळी मांडला. यापूर्वी श्री वाकडे यांची विविध वीस पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. दरम्यान, या पुस्तकासाठी सहकार्य करणारे प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, विठ्ठलराव साबळे, दत्ता शिवगण, प्रा.डॉ.श्रीहरी गुट्टे, दत्ता दहिभाते, यांचा यावेळी शाल, पुष्पगुच्छ, ग्रंथ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात सातवा व जिल्ह्यातून पाचवा क्रमांक मिळविण्याबद्दल अर्णव गादेकर, कीर्तनाच्या क्षेत्रात आपले नाव करणाऱ्या जनाई कोकाटे या विद्यार्थीनीचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन आशिष भोयटे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैभव चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला सुधांशू प्रकाशन संस्थेच्या सौ.सुमन वाकडे, रामेश्वर महाराज कोकाटे, विठ्ठलराव साबळे, श्री सूर्यवंशी, श्री काळदाते, आकाश चव्हाण, रामेश्वर मुळे, श्री डोंगरे, प्रशांत नाईकवाडे, सौ.काळे, सौ.डोंगरे, सौ.चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते

-------------------------------------------

चैन पडेना जिवाला..." अशा भावस्पर्शी घोषणा देत भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. गणेशोत्सवाच्या काळात दररोज श्रींची आरती विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येत होती. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. कृषीकुल येथे स्थापित बाप्पाची विसर्जन मिरवणूक खास आकर्षण ठरली. या भक्तीभावपूर्ण प्रसंगात "कृषिकुल"चा संघभाव, श्रद्धा आणि पारंपरिक सांस्कृतिक वारसा यांचे सुंदर दर्शन घडले.

-----------------------------------

त्याच्या प्रतिलिपी संबंधित मंत्री महोदय व प्रशासनातील सनदी अधिकारी यांना देऊन मा. गोरगरीब कष्टकरी कामगारांचे लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात यांना सदरिल प्रकरणात विशेष लक्ष देऊन उपेक्षित/वंचित असलेल्या परळी वीज कंत्राटी कामगारांना न्याय देण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती केली असल्याची माहिती कामगार नेते तथा संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील सर्व विभाग प्रमुख यांच्या अधिनस्त असलेले कंत्राटदार कार्यरत कंत्राटी कामगारांचा अर्धा व अर्ध्यापेक्षा जास्त पगार संबंधित अधिकारी व कंत्राटदार मागील अंदाजे 25 ते 30 वर्षापासून चोरी करून शासनाची व कंत्राटी कामगारांची फसवणूक करून लाखो कोटी रुपयांची सरकारची तिजोरी बेधडक लुटून, भ्रष्टाचार करून कंत्राटी कामगारांचे आजतागायत शोषण करत आहेत. मुख्य अभियंता हे मुख्य मालक असून कंत्राटदार यांनी कामगार कायद्याचे काटेकोरपणे पालन केले नाही तर, सर्वस्वी जबाबदारी मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ यांचीच असते. त्यांनी कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मूलन ) अधिनियम 1970 आणि किमान वेतन अधिनियम 1948 व अनुषंगिक लाभ कार्यरत कंत्राटी कामगारांना मिळतात का हे तपासणे गरजेचे असते. परंतु त्यांनी सुद्धा या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. सरकारी कामगार अधिकारी बीड यांनी निरीक्षणाबाबत आवश्यक माहिती व सुस्पष्ट अहवाल तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना सादर करून त्याची एक छायांकित प्रत संघटनेस अवगत करण्यासाठी द्यावी. अन्यथा दिनांक 17 सप्टेंबर 2025 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून कामगार प्रतिनिधी तथा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती, रोजंदारी मजदुर सेना मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अन्नत्याग उपोषण करतील. आंदोलनादरम्यान होणाऱ्या सर्व अनुचित प्रकारास महाराष्ट्र शासन, प्रशासनातील सनदी अधिकारी, जिल्हा प्रशासन आणि मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ व्यवस्थापनच जबाबदार राहील असे मा.ना.मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक 28 ऑगस्ट 2025 रोजी निवेदन सादर केले, त्यात नमूद केले आहे. अशी माहिती कामगार नेते तथा संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्ध पत्रका द्वारे दिली आहे.

-------------------------------------------

सय्यद अलाउद्दिन चे वारस सय्यद समियोद्दीन व सय्यद फयाज हे आहेत यांनी आपल्या कार्यालयात विरासत मंजुर करणे बाबत विरासत दाखल केलेली असुन सदरील विरासत मागील अनेक वर्षापासुन प्रलंबीत आहे व ती फाईल गठ्यामध्ये बांधुन ठेवण्यात आलेली आहे.सदरील मस्जीदची सेवा वरील इनामदार करीत आहेत विरासत प्रलंबीत असतांना काही इनामदार मयत झालेले आहेत. त्यामुळे सय्यद सलाउद्दिन पि. सय्यद खैरोद्दिन यांनी विरासत मंजुर होण्यासाठी दि.29/09/ 2016 रोजी आपल्या कार्यालयात विरासत दाखल केली आहे.परंतु वरील सर्व्हे नंबर बाबत काही लोकांनी महसुल अधिकाऱ्यांशी संगणमत करुन व बोगस वारस प्रमाणपत्र व बोगस वाटणीपत्र करुन वरील सर्व्हे नंबरच्या 7/12 ला त्यांची नावे लावलेली आहेत.तसेच सदरील सर्व्हे नंबर बाबत व्यक्ती जिवंत असतांना 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर वाटणीपत्र करुन बेकायदेशीररित्या महसुल अधिकाऱ्याला हाताला धरुन बोगस फेरफार घेतलेले आहेत.7/12 पत्रकाला बोगस लावलेली नावे कोणत्या आधारे लावली आहेत. याची चौकशी व्हावी.सदरील मिळकतीची ताबडतोब सुनावणी व्हावी,काही लोकांनी बोगस 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर वाटणीपत्र तयार करुन कसे नाव लावले याबाबत चौकशी करावी व याबाबत त्रीस्तरीय समिती गठीत करुन आपण स्वतःहा यांचे अध्यक्ष व्हावे,त्री सदस्य समिती मार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.जिल्हा अधिक्षक बीड,अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई, तहसिलदार धारुर,पोलीस स्टेशन धारुर यांना वेळोवेळी निवेदन व अर्ज दिलेले आहेत त्याचे अर्जावरुन मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी मा. जिल्हाधिकारी,पोलीस अधिक्षक बीड,मा.पोलीस आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांना देखील चौकशीसाठी पत्र देण्यात आलेले आहेत.परंतु सदरील अधिकाऱ्यांनी प्रकरण दाबुन ठेवलेले आहेत. संबंधीत इनामदार हा चकरा मारुन मारुन थकून गेले आहेत व काही इनामदार विरासत प्रकरणी चकरा मारु-मारु मयत झालेले आहेत. तसेच महसुल अधिकारी व भुमाफियांशी संगणमत करुन विरासत दाबुन ठेवली आहे. त्यामुळेवरील विषयी निवेदनाचा गांभीर्यपूर्वक विचार न केल्यास इनामदारांना न्याय व हक्क देण्यासाठी आपल्या कार्यासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा आंबेडकरी विचार व मोर्चाच्या वतीने मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिला आहे.निवेदनाच्याप्रतिलिपी संबंधित विभागाच्या कार्यालयाला दिल्या आहेत.

-------------------------------------------

# अत्याधुनिक युगात 100 टक्के साक्षर होणे गरजेचे.

1965 मध्ये 8 ते 19 सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर 1966 साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने 8 सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात 8 सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे.कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे. आजही भारतसुध्दा पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त 60 टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या थांबविण्याचा संकल्प 8 सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे.कारण बदलत्या काळानुसार 100 टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते 100 टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत.त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण,भुकमरी, वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो.भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते. यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे.जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत.आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त 20 टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या 78 वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करु शकला नाही.पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी 8 सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे. हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी,खान-पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दुःख, सुविधा, परिपक्वता,संस्कृती, आरोग्याची काळजी, सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे. त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता, अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरु आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.ॲम्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले, जंगल संपदा मानवाने नष्ट केली, नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वी भयभीत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी,वण्यप्राणी)त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल. चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.8 सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
सोमवार दि. 08 सप्टेंबर 2025


# दादाचा वादा पण बीडमध्ये नाय... नाकावर टिच्चून जेलरने केला मोठा कारनामा




बीड: वाल्मिक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट दिल्याचा आरोप असलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती कारागृह पुन्हा चर्चेत आले आहे. विनापरवाना वृक्षतोड केल्याने कारागृह प्रशासनाविरोधात पर्यावरण प्रेमींकडून संताप व्यक्त केला जात आहे.

संतोष देशमुख आणि प्रकरणातील आरोपी जिल्हा मध्यवर्ती कारागृहामध्ये आहेत परंतु कारागृह आता नव्या प्रकरणामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे.. कारागृहाच्या परिसरात 50 ते 60 वर्षांपूर्वीची मोठी वृक्ष कारागृह प्रशासनाने अचानक तोडून विकल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पालकमंत्री अजित दादा असलेल्या बीड जिल्ह्यात वनक्षेत्र कमी असलेले ते वाढवण्यासाठी एकाच दिवशी 30 लाख वृक्ष लागवडीचा विक्रम करण्यात आला.कीकडे प्रशासन वृक्ष लागवडीसाठी आग्रही असताना दुसरीकडे मात्र मध्यवर्ती कारागृहातच पान 3 वर

# जय भवानी गणेश मंडळाच्या योगी आदित्यनाथांनी घातली भुरळ



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) भगव्या वस्त्रामध्ये नागरीकांना अभिवादन करणारे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांनी परळीकरांना चांगलीच भुरळ घातली आणि हा सजीव देखावा सादर केला होता येथील जय भवानी गणेश मंडळाने... यासोबतच महादेव, हनुमान आणि ऋषी यांचाही देखावा सादर केला.

जय भवानी गणेश विसर्जन मिरवणूक पारंपरिक पद्धतीने साजरी करुन परळीत डीजे मुक्तीचा संदेश दिला. किर्तीनगर मधील जय भवानी गणेश मंडळ हे गेल्या 27 वर्षापासून काही तरी समाजउपयोगी उपक्रम साजरे करत असतात. यावर्षी ही जय भवानी गणेश मंडळानी प्रयागराज, कुंभमेळा, केदारनाथ हा स्थायी देखावा केला होता.

मिरवणुकीत विशेष आकर्षण म्हणून योगी आदित्य नाथ, महादेव,हनुमान. साकारले होते. मंडळाचे सुमारे 80 पान 3 वर

# जिथे मराठा आंदोलकांनी घेरले, त्याच गेवराईतून हाकेंचा विजयसिंह पंडितांना इशारा



बीड : ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांनी जिल्ह्याच्या गेवराई येथे आगमन करताच ओबीसी बांधवांनी त्यांचे जंगी स्वागत केले. काही दिवसांपूर्वी याच माजलगाव शहरात लक्ष्मण हाके यांच्याविरोधात जोरदार नाराजी व्यक्त करण्यात आली होती, त्यांच्या गाडीवर दगडफेक करून त्यांच्यावर चप्पल फेकण्यात आली होती. यानंतर त्यांना गेवराई येथून बाहेर जावे लागले होते, मात्र आज लक्ष्मण हाके हे याच गेवराई आले असता त्यांचं मोठ जंगी स्वागत करण्यात आले आणि भव्य अशी रॅली काढण्यात आली.

प्रा. लक्ष्मण हाके उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की, आम्ही किती दिवस गुलामी सहन करायची? गावागावात जाती जातीत युती करायची आणि राजकीय सत्तेची शेती करायची आहे. बारामतीनंतर गेवराईने पान 3 वर

# वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याची तलावात उडी घेऊन आत्महत्या



वडवणी :- वडवणी तालुक्यातील चिखलबीड ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या देठेवाडी तलावात एक मृतदेह तरंगताना आढळून आल्याने खळबळ उडाली होती पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह तलावाच्या बाहेर काढला असता ओळख पटली असून वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणारे डॉ. शुभम यादव यांचा मृतदेह असल्याची ओळख पटली आहे.

वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणारे डॉ. शुभम बालकनाथ यादव (रा. देवळा ता.अंबाजोगाई) हल्ली मुक्काम बीड हे एक दिवसापासून बेपत्ता होते. बेपत्ता असल्याची तक्रार डॉ.यादव यांचे वडील बालकनाथ यादव यांनी बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली होती.काल सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास देटेवाडी तलावात डॉ.शुभम बालकनाथ यादव यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. मानसिक ताणवाखाली येऊन आत्महत्याचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. पान 3 वर

# परळी तील हबीबपुरा मूलभूत सुविधा पासून वंचित



परळी वैजनाथ (प्रतिनिधी): परळी परळीतील मुलीकपुरा रोड ते वडार कॉलनीच्या वरच्या भागावर हबीबपुरा गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. या भागाला नेमका ग्रामीण की शहरी असा दर्जा न मिळाल्याने नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही.

ग्रामीण योजनांचा लाभ घ्यायचा म्हटले की सरपंच म्हणतात "ही वस्ती शहरात आहे," तर शहरी योजना मागितल्यास नगरपरिषद सांगते "तुम्ही ग्रामीण भागात आहात." या दुटप्पी भूमिकेमुळे पंतप्रधान घरकुल योजना, रमाई घरकुल योजना यासारख्या महत्त्वाच्या योजना येथील रहिवाश्यांना मिळत नाहीत. आश्चर्याची गोष्ट आहे परळी मध्ये हजारोची संख्यानि घरकुल आलेले आहेत पान 3 वर

# गणेशोत्सव विसर्जनाच्या पारंपरिक मिरवणुकीत
## बाजीराव भैय्या धर्माधिकारींचा दांडपट्टा
### प्रेक्षकांनी केला फुलांचा वर्षाव



परळी (प्रतिनिधी) – पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणूकांचा आनंदच काही वेगळाच असतो. काल परळी शहरात संपन्न झालेल्या DJ मुक्त मिरवणुकीत लाठी-काठीचे प्रात्यक्षिके आणि ढोल पथकाच्या गजरात शहरवासीयांनी उत्सवाचा आनंद लुटला.

यावेळी परळी शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनीही संमीलित होत गणेशोत्सवाचा आस्वाद घेतला. त्यांनी एखाद्या योदध्यासारखा दांडपट्टा चालवून मिरवणुकीत उपस्थितांना थक्क केले. त्यांची ही अजब कला पाहून प्रेक्षकांकडून फुलांचा वर्षाव करण्यात आला आणि उपस्थितांनी त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.गणपती बप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकरया... च्या घोषणांनी संपूर्ण परळी शहर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेले

# परळीत 29 सप्टेंबर रोजी सुजात दादा आंबेडकर यांची एल्गार सभा-बालासाहेब जगतकर



परळी प्रतिनिधी -- परळी शहरात 29 सप्टेंबर रोजी सुजाता दादा आंबेडकर यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की काल दिनांक पाच नऊ 2025 रोजी परळी शहर संपर्क कार्यालयात वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा अध्यक्ष माननीय शैलेश भाऊ कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रसंनजीत रोडे सहसचिव एडवोकेट संजय रोडे , जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बालासाहेब जगतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात येऊन या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू व वचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय अडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांचे चिरंजीव युवकांचे पान 3 वर

# परळीत डीजेमुक्त मिरवणुका; ढोल-ताशांच्या गजरात पारंपरिक उत्सव साजरा



परळी (प्रतिनिधी) – गणेशोत्सव काळात ध्वनीप्रदूषण व सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार डीजे, डॉल्बी साऊंड सिस्टीम आणि लेझर लाईट्सच्या वापरावर यंदा पूर्णतः बंदी घालण्यात आली होती. बीड जिल्ह्यातील या निर्णयाची अंमलबजावणी आदरणीय जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कावत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध रितीने झाली.

यंदा परळी शहरात पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या तालावर, विविध पोशाखांनी सजलेल्या भव्य मिरवणुका पाहायला मिळाल्या. डीजेमुक्त मिरवणुकीमुळे ध्वनीप्रदूषण पूर्णपणे टळले आणि हरवलेली पारंपरिकता पुन्हा नव्या जोमाने अनुभवायला मिळाली. विशेष म्हणजे, शहरात प्रथमच महिलांच्या ढोल पथकांची भव्य उपस्थिती होती. महिलांनी ढोल-ताशांच्या तालावर दिलेला नजराणा पाहण्यासाठी मोठी गर्दी जमली होती.

गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी पोशाख परिधान करून, शिस्तबद्ध रितीने, संयमानं मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी कुठेही वादविवाद, भांडणे किंवा गोंधळ झाल्याचे चित्र दिसून आले नाही. शिस्त, पान 3 वर

# ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे यांच्या भागवतकथेचे संगम येथे आयोजन



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) मानवतेचे आदर्श दृष्टीकोन आणि भक्तिभावाने जीवन जगलेल्या स्व. अक्षय तुकाराम मुंडे यांच्या द्वितीय पुण्यस्मरण सोहळ्या निमित्ताने संगम नगरीत सोमवार, दि. 8 सप्टेंबर 2025 रोजी सुरुवात होईल भागवत कथा या कार्यक्रमाची सांगता 15 सप्टेंबर रोजी पुण्यतिथी चा कार्यक्रमाची सांगता ह.भ.प.प्रभाकर नाना झोलकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता व महाप्रसाद या सोहळ्यामुळे परिसरात भक्ती, अध्यात्म व संस्कारांचा माहोल निर्माण होणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रसिद्ध भागवताचार्य ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे (संगमकर) यांचे रसाळ, कथा अंतःकरणाला स्पर्श करणारी कथा होणार आहे. त्यांच्या वाणीतील भक्तिगीते व जीवनमूल्यांचा संदेश श्रोत्यांना पान 3 वर

# महानायक ग्रुप, महाराष्ट्र राज्य कार्यकारणी बरखास्त




माजलगाव प्रतिनिधी:- महानायक ग्रुप, महाराष्ट्र राज्य ग्रुपच्या माध्यामातुन महाराष्ट्रातील शोशित, पिडीत व गरजु लोकाच्या मदतीसाठी महानायक ग्रुप च्या माध्यामातुन समाजसेवीची काम करण्यात येत होते. परंतु ग्रुपमध्ये तरुण व सामाजिक काम करणा-या नविन तरूणाना स्थान मिळावे या उद्देशाने ही कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आसल्याची माहिती महानायक ग्रुप तर्फे देण्यात आली आहे . व पुढील कार्यकारणी लवकरच जाहिर होईल असे महानायक ग्रुपचे सचिव तथा उपसरपंच शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच पुढील कार्यकारणी पान 3 वर

# लक्ष्मण वाकडे यांच्या 'एक होता ढम्या' या 7 भागांच्या कथासंग्रहांसह आठ पुस्तकांचे प्रकाशन थाटात संपन्न



परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- येथील ज्येष्ठ पत्रकार, शिक्षक श्री लक्ष्मण वाकडे यांच्या 7 बालकुमार कथासंग्रहांसह आठ पुस्तकांचे थाटात प्रकाशन करण्यात आले.

येथील शंकर पार्वतीनगर परिसरातील अभिषेक हॉटेलच्या टेरेस गार्डनवर कौटुंबिक कार्यक्रमात हा प्रकाशन सोहळा शुक्रवारी (दि.5) सायंकाळी संपन्न झाला. श्री वाकडे यांच्या 'एक होता ढम्या' या कथा पुस्तिकेचे सात भाग व 'श्री बैद्यनाथ ज्योतिर्लिंग परली' या माहिती पुस्तकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन यावेळी करण्यात आला.

प्रकाशन सोहळ्यासाठी श्री लक्ष्मण वाकडे यांच्या मातोश्री श्रीमती पार्वतीबाई ईश्वरराव वाकडे यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक श्री प्रमोद गादेकर, रामकिशन दहिभाते, शिक्षिका सौ.आर.पी.गादेकर, संत धुराबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक वसंतराव राठोड, कन्या सौ.स्नेहा शुभम पवळे, जावई श्री शुभम पवळे, ताई सौ.अरुणा बालाजी भोयटे आदी पान 3 वर

# गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.. घोषणांचा जयघोष!
## "कृषिकुल"च्या बाप्पांना भक्तिभावात भावपूर्ण निरोप



सिरसाळा / परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्र असलेल्या "कृषिकुल" येथे यंदाचा गणेशोत्सव भक्तिभावात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गणरायाच्या मूर्तीचे विधिवत विसर्जन करताना संपूर्ण परिसर "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!" आदि घोषणांच्या गजराने दुमदुमून गेला.

विसर्जनाच्या दिवशी कृषिकुलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. ढोल, ताशा, हालगीच्या तालावर लेझीमच्या पारंपरिक निनादात श्रीगणेशाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. "गणपती चालले गावाला... पान 3 वर

# औष्णिक विद्युत केंद्र परळी च्या आस्थापनेतील निरीक्षण अहवालानुसार कायदेशीर कारवाई तात्काळ करावी अन्यथा अन्नत्याग उपोषण-भाई गौतम आगळे



परळी ( प्रतिनिधी ) परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या आस्थापनेची सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोणाळे, निरीक्षक काशीद चव्हाण व संबंधित कर्मचाऱ्यांनी 19 ऑगस्ट 2025 ते 23 ऑगस्ट 2025 सलग पाच दिवस किमान वेतन कायदा 1948 सह विविध प्रचलित कामगार कायद्याअंतर्गत निरीक्षण केले आहे. त्याप्रमाणे सर्व विभाग प्रमुखांच्या अधिनस्त असलेले कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई तात्काळ करावी अन्यथा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून कंत्राटी कामगार प्रतिनिधी तथा रोजंदारी मजदूर सेनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अन्नत्याग उपोषण करतील, असे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना देऊन पान 3 वर

# भूमाफियांच्या घशात अडकलेली धारूर येथील मस्जिद मुलानी व गुलजार देवस्थानची विरासत सुरु करुन बेकायदेशीर लोकांची नावे कमी करा-
## आंबेडकरी विचार मोर्च्याच्या वतीने सय्यद सलीमबापू यांचा उपविभागीय अधिकाऱ्यांना उपोषणाचा इशारा

माजलगाव प्रतिनिधी :- भूमाफियांच्या घशात धारूर येथील मस्जिद मुलानी व गुलजार देवस्थानची विरासत अडकली आहे.ती तात्काळ मुक्त करुन यावर लागलेल्या बेकायदेशीर लोकांचे नावे कमी करण्यात यावे. त्याच प्रमाणे देवस्थानच्या जमिनी हडपणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई करण्यात यावी नसता. 11 सप्टेंबर 2025 रोजी आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा आंबेडकरी मोर्चाच्या वतीने मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिला आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,सव्र्हे नं. 20 क्षेत्रफळ 21 एकर 06 गुंठे, सव्र्हे नं.69 क्षेत्रफळ 25 एकर 37 गुंठे सव्हे नं. 77 क्षेत्रफळ 23 एकर 08 गुंठे शिवार धारूर ता.धारुर जि.बीड येथील मस्जित मुलानी व गुलजार देवस्थान ची जमीन आहे व सदरील जमीनीबाबत त्याचे मुळ इनामदार मयत सय्यद निजामोद्दीन पि.सय्यद कादर हे आहेत.त्याची वंशावळ खालीलप्रमाणे आहे. सय्यद निजामोद्दीन यांचे तीन मुले नामे सय्यद दुलेमियाँ (मयत), सय्यद नुरोद्दिन(मयत),सय्यद रुक्मोद्दिन(मयत)सय्यद रक्मोद्दिन यांचा मुलगा सय्यद खैरोद्दिन (मयत)सय्यद खैराद्दिचे वारस सय्यद अलाउद्दीन येत),सय्यद सलाउद्दिन,सय्यद अशरफ(मयत), सय्यद मैनोद्दिन (मयत)व पान 3 वर

